नागरिकांची सनद

CITIZEN CHARTER

सेंट झेविअर्स टेक्निकल इन्स्टिटयुट, माहिम, मुंबई

(अशासकीय अनुदानित स्वायत्तता संस्था)

सेंट झेविअर्स टेक्निकल इन्स्टिटयुट,

माहिम कॉजवे, माहिम

मुंबई – ४०००१६

दूरध्वनी क्रमांक – ८५९१७६२७६३ फॅक्स - + ९१(२२)२४४५ ४४८२

ई मेल – **office@xaviertech.ac.in**

वेबसाईट – **www.xaviertech.ac.in**

शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग

क्र. एसआसव्ही २००४/प्र.क्र. १५/०४/१२ दिनांक २६ मे २००६

नागरिकांची सनद

प्रस्तावना :

देशामध्ये प्रशिक्षित /कुशल तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करण्याच्या हेतुने सेंट झेविअर्स टेक्निकल इन्स्टिटयुट मुंबई या संस्थेची स्थापना सन १९३७ मध्ये बॉम्बे झेविरिअन ट्रस्ट व महाराष्ट्र शासनाच्या मदतीने केली. तंत्र शिक्षणाचा अभ्यासक्रम चालविण्यासाठी सेंट झेविअर्स टेक्निकल इन्स्टिटयुट ही संस्था सन १९६७ मध्ये माहिम, मुंबई या ठिकाणी चालू करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण या प्रशासकीय विभागांतर्गत व तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि अल्पसंख्यांक विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखाली संस्था कार्यरत आहे.

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील (ख्रिश्चन, मुस्लिम, बौध्द, शीख, पारसी व जैन) विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून संस्थेला सन २००८ – ०९ पासून अल्पसंख्यांक संस्थेचा दर्जा बहाल केला आहे. सेंट झेविअर्स टेक्निकल इन्स्टियुट, मुंबई ही ख्रिश्चन अल्पसंख्यांक संस्था आहे. शासन निर्णय दिनांक ३० मे १९९४ अन्वये सन १९९४-९५ या वर्षापासून संस्थेस शैक्षणिक स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे. त्या अंतर्गत संस्था उदयोगधंदे व स्थानिक गरजा विचारात घेवून आवश्यक असणारे अभियंते तयार करण्यासाठी स्वतःचे अभ्यासक्रम तयार करते व परिक्षा घेते. अभियांत्रिकी व्यावसायिक अभ्यासक्रमाचे पदविका स्तरावरील शिक्षण / प्रशिक्षण देवून उदयोगधंदयाना योग्य दर्जाचे अभियंता निर्माण करण्याचे कार्य संस्था करते. संस्थेचा ९०% खर्च महाराष्ट्र शासनाने दिलेल्या अनुदानामधुन करण्यात येतो. विदयार्थ्यांच्या शुल्कापोटी जमा होणा-या रक्कम यामधून उरलेला १०% खर्च भागविण्यात येतो. वेतनेत्तर अनुदानापोटी मिळणा-या रकमेमधून ग्रंथालय पुस्तके, दुरध्वनी खर्च, पाणीपटटी, प्रयोगशाळेमधील चालू खर्च, बगीचा, धुलाई भत्ता इत्यादी खर्च भागविण्यात येतो.

संस्थेमध्ये जनतेसाठी खालील सोयी /सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात.

१) पदविका अभियांत्रिकी शिक्षण :

अ. प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश पात्रता :

Candidate should be an India National & should have passed the SSC (Std. X) Examination of Maharashtra State Board of Secondary Education or its equivalent, with subjects Maths / Mathematics, General Science and English with minimum 35% aggregate marks.

Note :

The term " aggregate marks" used here shall mean as follows.

A. For Maharashtra State Board Candidates :-

- The candidates who have passed SSC Examination after March 2009, the aggregate Marks shall be total marks of 5 subjects taken into consideration and mentioned on the Mark Sheet.
- Candidates who have passed Maths / Mathematics (Code 71 for Maharashtra State Board candidates) and Science & Technology (code 72 for Maharashtra State Board candidates) are only eligible for admission.
- In case marks against sports activities are given on the mark sheet, these shall be added to the aggregate marks for deciding merit.
- In case marks against sports activities are give on the mark sheet, these shall be added to the aggregate marks for deciding merit.

B. For ICSE & CBSE Candidates :-

- Student seeking admission on the basis of Group 1 & Group 2 subjects only, the aggregate marks shall be the grand total of marks in any of the 5 subjects from Group 1 & Group 2 where he /she has scored maximum marks.

- Student seeking admission on the basis of Group 1, Group 2 & Group 3, Aggregate marks shall be the grand total of all subjects from all groups.

- For CBSE /ICSE Candidates:- The aggregate mark means the grand total of marks obtained by the candidate, including all subjects as declared on Mark sheet.

- For CBSC /ICSE Candidates : In Case the result of the candidate is given in terms of grades, such Candidates are required to submit the graded result into the equivalent marks authorised from the concerned institute / Board. Candidates passing SSC from other than State Boards or Central Boards shall bring equivalent certificate from Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE).

- Any amendments /Acts/Judgments which may be published by Government /Hon. Courts of India from time to time will be applicable to candidates and Institutes under these rules of admission.

अनुदानित (AIDED COURSE)

अनु क्र.	अभ्यासक्रम	अभ्यासक्रम सुरु झाल्याचे वर्ष	कालावधी	प्रवेश क्षमता	प्रतिवर्षी		
१	अणुविदयुत व अभियांत्रिकी इंजिनिअरिंग **Diploma in Electronics & Telecommunication Engg.**	२००७	३वर्षे (६ सत्र)	१२०	शिक्षण शुल्क ६०००	विकास निधी १०००	इतर शुल्क ५५०

उपरोक्त अभ्यासक्रम हा पुर्णवेळ चालविला जातो. तसेच उपरोक्त नमुद शुल्का व्यतिरिक्त अमर्त्य विमा योजना हप्ता, इंन्स्टिटयुशन ऑफ इंजिनियर्स, इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन सभासद शुल्क, परिक्षा शुल्क त्यात्यावेळी निर्धारित केलेल्या दराने लागू राहील.

विनाअनुदानित (UNAIDED COURSE)

अनु क्र.	अभ्यासक्रम	अभ्यासक्रम सुरु झाल्याचे वर्ष	कालावधी	प्रवेश क्षमता	प्रतिवर्षी		
१	कॉम्प्युटर इंजिनिअरिंग Diploma in Computer Engg.	२०२४	३वर्षे (६ सत्र)	१२०	शिक्षण शुल्क ४०९०९	विकास निधी ४०९१	इतर शुल्क १४००

उपरोक्त अभ्यासक्रम हा पुर्णवेळ चालविला जातो. तसेच उपरोक्त नमुद शुल्का व्यतिरिक्त अमर्त्य विमा योजना हप्ता, इंन्स्टिटयुशन ऑफ इंजिनियर्स, इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन सभासद शुल्क, परिक्षा शुल्क त्यात्यावेळी निर्धारित केलेल्या दराने लागू राहील.

संस्थेतील विनाअनुदानित (Unaided) अभ्यासक्रमांचे (Computer Course) शुल्क हे **'शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य'** (Fee Regulating Authority – FRA) यांच्याद्वारे दरवर्षी मंजूर आणि निर्धारित केले जाते.

C. Tuition Fee Waiver Scheme (TFWS) of AICTE The salient features of the scheme are:-

Fee Waiver Scheme as a separate choice -

- In the event of non-availability of students in this category the same shall not be given to any other category of applicants.
- Candidates willing to opt for TFWS seats will have to specify their willingness in the option form as a separate choice code.
- Only Maharashtra State candidates will be admitted against such additional seats.
- These seats shall be filled only through Round- I and Round II of CAP process.
- If the competent authority finds that there is inadequate number of beneficiaries available for the particular course at the institute at the end of CAP Round – II then such seats will not be filled and will remain vacant.
- List of Technical Institutes having approvals for Tuition Fee Waiver scheme shall be made available before the submission of option form.
- The Institutions should publish in their brochure and web site the number of tuition fee waivers available in each category in each course / division.
- The competent Authority will prepare merit list of applicants from eligible students and will effect admissions strictly on merit basis.

- A letter in this respect hall be issued by the Competent Authority for admissions to Each beneficiary.

- Students admitted under this Scheme shall not be allowed to change Institution /Course under any circumstances.

- The competent authority and Institutions will display the information regarding Admitted candidates in their respective web sites for information to the students and other stakeholders.

- Candidates willing to opt for these additional TFWS seats will have to submit income certificate stating that his /her parent's annual income is less than Rs. 4.50 lakhs from all sources from the appropriate competent authority of the Maharashtra State. Candidate admitted under this seats will not be eligible t get the benefit of any other Scholarship or Freeship though they are belonging to any reserved category.

❖ग्रंथालय –

विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक व संशोधनात्मक गरजांसाठी अद्ययावत पुस्तके, संदर्भ ग्रंथ, आणि अभ्यासिका (Reading Room) उपलब्ध करून दिली जाते. पदविक पूर्ण् करेपर्यत प्रथम प्रवेशाच्यावेळी विदयार्थ्यांकडून एकदाच रु. ३००/- ग्रंथालय फी घेण्यात येते व त्यांना ओळखपत्र (ID Card) दिले जाते. नियमित अभ्यासक्रमाची पुस्तके विदयार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जातात.

ब. थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश पात्रता :

Eligibility criteria : -

Candidate should be Indian National and must have passed HSC Science or HSC (Bifocal /Technical) or HSC (Vocational /MCVC) Examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or SSC with 2 years duration ITI / ITI COE with 3 modules with appropriate specialization or its equivalent.

Note :

- Candidate with HSC vocational (MCVC) or 10+2 ITI / ITI COE should have passed SSC (10th Std) or equivalent examination with subjects English, Mathematics (Code 71) and Science (Code 72)

- Eligibility of the student for the specific branches of Diploma programmes shall be as per MSBTE guidelines prescribed in the Information Brochure.

- Other than Maharashtra State Candidates are not eligible for admission under CAP.

क. प्रथम वर्ष प्रवेशामध्ये शासनाच्या धोरणानुसार मागसवर्गियांच्य विविध गटांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. तसेच प्रत्येक प्रवर्गात महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव असतात. अपंगांसाठी सुध्दा जागा राखीव ठेवण्यात येतात.

ड. शिष्यवृत्ती योजना :-

केंद्र / महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार संस्थेत प्रवेश घेतलेल्या मागसवर्गीय विदयार्थ्यांना खालीलप्रमाणे कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

Sr. No.	Student's Castegory	Income Limit for Scholarship	Name of Scholarship	Benefits
1.	OBC, SBC, VJNT	Below 1,50,000/-	Government of India Post – Matric Scholarship	Other Fees + Tuition Fees + Exam Fee Wave
2.	OBC, SBC, VJNT	Below 1,00,001/- to 8,00,000/-	Post – Matric Tuition fee and Examination Fee	
3.	SC	Below 2,50,000/-	Government of India Post – Matric Scholarship	
4.	SC	Above 2,50,001 and Max. No Income Limit	Post – Matric Tuition fee and Examination Fee	
5.	ST	Below 2,50,000/-	Post – Matric Government of India Scholarship	
6.	ST	Above 2,50,001 And Max. No. Income Limit	Tuition Exam Fee (Freeship)	
7.	General (OPEN)	Below 8,00,000/-	Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Yojana (EBC)	50% of Tuition fees + Exam Fees Reimburse
8.	Minority Community : Muslim, Christian, Sikh, Parsi, Jain and Jews	Below 8,00,000/-	Scholarship Scheme for students of minority communities pursuing higher and professional Education	Rs. 50,000/- or Actual course fees, whatever is less

उपरोक्त शिष्यवृत्ती सवलत प्राप्त करुन घेण्यासाठी सर्व संबंधित विदयार्थ्यांनी लागू असलेल्या सवलतीचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने पुढे नमुद केलेल्या संबंधित संकेत स्थळावर भरुन त्याची प्रिन्ट ऑऊट घेऊन आवश्यक असलेल्या इतर दस्तऐवजांसह विहित वेळेत भरुन मंजूरीसाठी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त शिष्यवृत्ती / फ्रिशीपचा लाभ मिळण्यासाठी सर्व मागास वर्गातील विदयार्थ्यांनी आपापला जात प्रमाणपत्र पडताळणीसाठीचा प्रस्ताव संस्थेत प्रवेश घेतल्यापासून एक वर्षाच्या आत परंतु संबंधित विदयार्थ्यांचा स्कॉलरशिप / प्रिशीपचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यापूर्वी त्यांनी त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचा प्रस्ताव दोन प्रतीत आवश्यक दस्ताऐवजांसह कार्यालयास सादर करुन कार्यालयाचे सक्षम अधिका-यांची सदर अर्जावर स्वाक्षरी घेऊन जातवैधता पडताळणी समितीकडे स्वतः सदरचा प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करावा. यानंतर जात वैधता प्रमाणपत्र विदयार्थ्यांस प्राप्त झाल्यानंतर वैधता प्रमाणपत्राच्या तीन सत्य प्रती कार्यालयास तात्काळ सादर करण्यात जे विदयार्थी जात वैधता प्रमाणपत्र प्रस्ताव विहीत मुदतीत कार्यालयास अथवा संबंधित पडताळणी समितीकडे सादर करणार नाहीत. त्यांना संबंधित शैक्षणिक वर्षासाठी स्कॉलरशिप / फ्रिशीपचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. अशा विदयार्थ्यांना त्या त्यावर्षाची टयुशन फी भरावी लागेल.

www.etribal.maharashtra.gov.in सदर हे संकेत स्थळ फक्त अनुसुचित जमातीसाठी आहे.

www.mahaeschol.gov.in हे संकेत स्थळ फक्त अनुसुचित जातींसह सर्व मागास प्रवर्गासाठी (एससी, व्हिजे, डीटी, एनटी, एसबीसी, ओबीसी इत्यादी)

www.etribal.maharashtra.gov.in सदर हे संकेत स्थळ फक्त अनुसुचित जमाती (एस टी प्रवर्ग) व्यतिरिक्त इतर मागास सर्व मागास प्रवर्गासाठी जाती पडताळणीचा अर्ज या संकेत स्थळाचा वापर करावा.

वेळोवेळी होणा-या बदलामुळे शासनाने सन २०२६-२७ पासून https://mahadbt2.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ चालू केलेले आहे. वर नमुद केलेल्या सर्व शिष्यवृत्तींचा लाभ शासनाने एकाच संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेला आहे.

❖ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती :

ख्रिश्चिन, मुस्लिम, बौध्द, शीख, पारसी व जैन अल्पसंख्यांक समाजातील ज्या विदयार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ६ लाख पर्यंत आहे. अशा विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती महाराष्ट्र सरकार कडून दिली जते. या शिष्यवृत्तीची सवलत मिळण्यासाठी अल्पसंख्यांक समाजातील संबंधित विदयार्थ्यांने https://mahadbt2.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर ऑन लाईन अर्ज भरुन भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून सोबत संकेत स्थळावर दिलेल्या आवश्यक दस्तऐवजांसह कार्यालयात विहीत वेळेत सादर करावीत. (याबाबतची अर्जासोबत सादर करावयाची प्रमाणपत्र दस्तऐवजी बाबतची माहिती सदर संकेत स्थळावर उपलब्ध आहे.)

रु. २५०/- दरमहा शिष्यवृत्ती, रु. २००/- दरमहा प्रवासभत्ता वसतीगृहात राहणा-या विदयार्थ्यांना रु. १०००/- दरमहा भोजन भत्ता, वसतीगृहाचा खर्च, रु. ३०००/- प्रतीवर्षी पुस्तके व गणवेशासाठी इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात.

टिप :- उपरोक्त शिष्यवृत्त्यांपैकी तसेच इतर केंद्रशासन /राज्य शासन / पब्लिक ट्रस्ट/ स्थानिक स्वराज्य संस्था /इत्यांदीपैकी देण्यात येणा-या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती / फ्रिशिप च्या लाभांपैकी ज्या शिष्यवृत्तीची / फ्रिशिपची रक्कम जास्त असेल त्यापैकी कोणत्याही एकाच शिष्यवृत्तीचा /फ्रिशिप विदयार्थ्यांस अनुज्ञेय राहिल. मात्र कोणत्याही विदयार्थ्यांने ऐकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीचे लाभ घेतल्याचे आढळून आल्यास त्यांचे कडून नियमानुसार संपूर्ण फी वसूल करण्यात येईल.

इ. इतर विदयार्थ्यांना सवलती :

शासनाकडून वेळोवेळी निर्धारित केलेल्या दराने उपरोक्त विदयार्थ्यांना सवलतीचा लाभ देय ठरतो.

खाली नमुद करण्यात आलेल्या गटातील विदयार्थ्यांना त्यांचे पुढे नमुद केल्याप्रमाणे शासन नियमानुसार शिक्षण शुल्क मंजूर होऊन प्राप्त झाल्यानंतर १ महिन्याच्या आत परत करण्यात येते.

गट	उत्पन्न मर्यादा	शुल्क सवलत रक्कम
प्राथमिक शिक्षक पाल्य (पी,टी,सी)	मर्यादा नाही	रु. २५००/-
माध्यमिक शिक्षक पाल्य (एस,टी,सी)	मर्यादा नाही	रु. २५००/-
माजी सैनिक /सैनिक पाल्य	मर्यादा नाही	रु. १०००/-
एम.एस.बी.टी.ई. स्कॉलरशिप	५ लाख	रु. ७०००/-

- विदयार्थ्यांना उन्हाळी व हिवाळी सुटटीच्या कालावधीत त्यांच्या मुळ गावी जाण्यासाठी रेल्वे /एसटी सवलतीचे प्रमाणपत्र देण्यात येते. या व्यतिरिक्त विदयार्थ्यांना औदयागिक /उदयोग समुहाच्या भेटींसाठी तसेच खेळाच्या स्पर्धासाठी व पेपर सादरीकरणासाठी वरील प्रमणे सवलतींचा लाभ देण्यात येतो.

❖ **वसतीगृह सुविधा** : संस्थेत वसतीगृहाची उपलब्ध नाही. परंतु भविष्यात याची /तरतुद करण्यात आलेली आहे. जेणेकरुन ज्यांची मुंबईत वास्तव्याची (राहण्याची) व्यवस्था नाही. अशा विदयार्थ्यांना राहण्याच्या व्यवस्थेसाठी वसतीगृहाची गरज आहे.

❖ रेल्वे प्रवास, बस प्रवास इत्यादी मध्ये सवलती व प्रमाणपत्र मिळण्यासाठी विदयार्थ्यांनी आवश्यक अर्ज भरुन दिल्यापासून ७ दिवसाच्या आत प्रामणपत्र दिले जातात. तसेच इतर प्रकारचे प्रमाणपत्र /दाखले प्राप्त करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे न्युनतम कालावधी निर्धारित केलेला आहे.

संस्था सोडल्याचे प्रमाणपत्र - ७ दिवस

बोनाफाईड प्रमाणपत्र - ३ दिवस

ट्रान्सक्रिप्ट प्रमाणपत्र - १० दिवस

जिल्हाबदल प्रमाणपत्र - ५ दिवस

❖ **प्रशिक्षण व आस्थापन कक्ष** : संस्थेमध्ये प्रशिक्षण व आस्थापना कक्ष असून विभागप्रमुख दर्जाचे अधिकारी त्याचे प्रमुख आहेत. या कक्षामार्फत विदयार्थ्यांसाठी आवश्यकतेनुसार वेळोवेळी उदयोगधंदयांना भेटी आयोजित केल्या जातात. तसेच विदयार्थ्यांना नोकरी विषयक मार्गदर्शन केले जाते. विदयार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करुन त्यांना मुलाखतीसाठी विशेष प्रशिक्षण देऊन तयार केले जाते. विविध कारखान्यांच्या विविध पदांसाठी परिसर मुलाखती आयोजित करुन नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

❖ **निरंतर प्रशिक्षण योजना : सर्व समाजासाठी संस्थेत निरंतर शिक्षण योजना राबविली** जाते. या योजने अंतर्गत ६ ते १२ आठवडयापर्यंतचे विविध तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यामुळे कुशलता निर्माण होऊन नोकरी मिळविण्यासाठी, स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी लाभ होतो. या योजने अंतर्गत संस्थेत खालील प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येते. लोकाग्रहास्तव वेळोवेळी नविन अभ्यासक्रम चालू केले जातात.

❖ **६ व्या सत्रातील औद्योगिक प्रशिक्षण** (Industrial Training / Internship)

संस्थेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा व जबाबदारी (Services provided by Institute)

- इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकॉम इंजिनिअरिंग (EXTC) डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या ६ व्या सत्रातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव मिळावा, तांत्रिक कौशल्ये आत्मसात करता यावीत आणि उद्योग जगतातील नवीन तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी हे ६ महिने / १ पूर्ण सत्राचे (MSBTE नियमांनुसार) औद्योगिक प्रशिक्षण दिले जाते.
- नामांकित शासकीय, निमशासकीय व खाजगी कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी लागणारे. अधिकृत शिफारस पत्र (No Objection Certificate / Recommendation Letter) त्वरित उपलब्ध करून दिले जातात.
- प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे सनियंत्रण (Monitoring) आणि मूल्यमापन करण्यासाठी अधिव्याख्याता कंपन्यांमध्ये जाऊन भेटी देवून मूल्यांकन करतात.